# सन २०१४-१५ चे सुधारीत (दुरुस्त) अंदाज पत्रक व सन २०१५-१६ या वित्तीय वर्षा करिता उत्पन्न व खर्चाचे अंदाजा संबंधी आयुक्तांचे निवेदन

मा.सभापती, स्थायी समिती व सर्व सन्माननीय स्थायी समिती सदस्य,सभागृहात उपस्थित सर्व पत्रकार बंधुनो आणि माझ्या सहकारी मित्रांनो या ठिकाणी मी आपले स्वागत करतो.

जळगांव शहर महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे सुधारीत व सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाचे अपेक्षित उत्पन्न व अपेक्षित खर्चाचे अंदाज मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९,प्रकरण ९ कलम ९५ अन्वये स्थायी समितीस सादर करीत आहे.

सदर अर्थ संकल्प सादर करतांना, मी या जळगाव शहरातील सर्व नागरीक, त्यातीलही अत्यंत मध्यम वर्गीय नागरीक, त्यापेक्षा अधिक अत्यंत हाल अपेष्टात, कुठल्याही अपेक्षांशिवाय राहणारे नागरीक, कुठल्याही सुविधा न मिळताही या महानगरपालिकेची आर्थिक स्थिती समजावून घेवून स्वत:च समस्यांना पर्याय देत असतो. सर्व जात, धर्म, पंथ सोडून समाज शहीष्णेतून सर्व सण साजरा करणारा शहरातील नागरीक या सर्वांना मी समजूतीने व अधिक मानाने दंडवत करतो. गेल्या काही वर्षांमध्ये या माणसांसाठी आयुक्त म्हणून अधिक काही संरचनात्मक काम करून शकलो नाही, या बद्दल मी सर्वांची माफी मागतो. आपल्या या शहरातला सामान्य माणुस अत्यंत सोशिक, अत्यंत समजूतदार आणि अत्यंत प्रगल्भ आहे, असे आहे म्हणूनच हा माणूस, आपण कोणी एखादी अगाध, अगुढ, अनाकलनीय शक्ती या जगात आहे, हे अंधश्रध्देच्या पलीकडे जावून वैज्ञानिकदृष्टीने मानत असू तर, आपल्या सर्वांसमोर त्रिकाळ परीस्थितीत सर्व विश्व व्यापून उभा आहे हे आपल्याला मान्य करावे लागेल आणि त्याच्या शक्तीला दंडवत करावे लागेल. आपण माझ्या मताशी सहमत असाल किंवा नसाल या बाबत मी खात्रीशीर सांगु शकणार नाही, पण या शहरातला सामान्य माणुस या शहराबाबत चांगला विचार करणा-यांसोबत आहे, याची खात्री शहरातल्या सामान्य माणसाच्या वतीने मी आपल्याला देवू शकेल आणि ती मी आपल्याला या अर्थ संकल्पाच्या या प्रास्ताविकातून देत आहे.

या शहरात काम करतांना या सामान्य गरीब माणसाची, आपले पोट भरण्यासाठी कष्ट करणा-या व्यावसायिकाची, या शहराचा विकास व्हावा म्हणून धडपणा-या युवकांची मला कधीच भिती वाटली नाही. कारण ते हे शहर प्रश्नांच्या बाहेर काढण्यासाठी जो विचार करीत आहेत, ते जी आकांक्षा बाळगत आहेत, तोच विचार, तेच निर्णय मी माझ्या सहका-यांच्या माध्यमातून वेळोवेळी सभागृहात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पण खरच सांगतो, ब-याचदा खर सांगितल तर सुरवातीला वाईट वाटत पण सत्य हे अंतिम सत्य असत. या शहरातल्या नागरीकांपेक्षा कितीदा तरी मला या सभागृहाची भिती वाटली, कितीदा तरी निर्णय घेतांना मी सामान्य माणासाचा विचार करावा की सभागृहाचा ? हा विचार माझ्या मनात आला. परंतु जनता सर्वश्रेष्ठ आहे आणि त्यासाठी आपण सर्व जण काम करीत आहेत आपण या जनतेचे नोकर आहोत ही भावना मी कायम ठेवली आणि या जनतेच्या विश्वासावर मी येथे उभा आहे. या सभागृहात मी अनेक गोष्टी ऐकल्या, अनेक आरोप झेलले, रोज ते वाढणार आहेत पण या सामान्य माणसाच्या ताकदीवर मी उभा आहे. या सभागृहास हे मान्य करावे लागेल की, सामान्य माणुस त्याची सहनशीलता, उदारवृत्ती, त्यांची क्षमाशिलता हीच आपली ताकद आहे. आपल्या भिक्षेच्या झोळीतूनही हा सामान्य माणुस उपाशी माणसाचे पोट भरण्यासाठी धडपडतो, त्यास कधीही विरोध करीत नाही, परीस्थिती समजावून घेतो, त्यापासुन आपणास सर्वांना काही शिकण्याची आवश्यकता आहे आणि माझी अपेक्षा आहे की, आपण सर्व त्यापासून काही शिकुया, तरच आपण या शहराचा विकास करू शकू. कदाचित या शहराचा हा मी सादर करीत असलेला शेवटचा अर्थसंकल्प असेल. सवयीने येथील माणासाला मी पुढे आठवणारही नाही. पण मला कायमच याचे समाधान राहील की हे शहर कर्जमुक्त होवू शकते आणि विकासाच्या वाटेवर धावू शकते. आपण सर्वांनी ठरविले तर आपण या शहराला चांगले रस्ते, विज, पाणी पुरवठ्याच्या सुविधा करू शकतो, एक स्मार्ट सिटी म्हणून हे शहर विकसित होवू शकते. हे गेल्या दोन वर्षात या सभागृहाच्या माध्यमातून मी शहरातील नागरीकांना सांगू शकलो आणि या शहराने यावर विश्वास ठेवला त्याबद्दल मी शहरवासियांचा आभारी आहे.

शहरातील खुल्या जागा असोत, व्यापारी गाळे असोत किंवा उत्पन्नाची इतर साधने असोत, करवाढीचे प्रस्ताव असोत वा महानगरपालिका कर्जबाजारी आहे म्हणून कोणतेही काम करू शकणार नाही ही कारणे असोत नागरीकांनी आपल्याला नेहमीच साथ दिली आहे. सामान्य नागरीक मला जेव्हा भेटायला येतात, तेव्हा या आर्थिक परीस्थितीचा विचार करूनच, आपल्या मागण्यांचा आग्रह धरत असतात, आणि तेवढयाच अडचणी मांडत असतात, म्हणूनच या सामान्य माणसा बरोबर या शहरात माझे जमले आणि त्याच्यासाठी काम करतांना मला नेहमीच आनंद वाटला हा आनंद या शहरातल्या सामान्य नागरीकाने मला दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सामान्य माणासासाठी नेहमीच चांगले काम करण्याचा माझा प्रयत्न असेल आणि या प्रयत्नांबरोबर हे सभागृह राहील याची मला अपेक्षा आहे.

आपण सर्वांनी सामान्य माणसाला केंद्रबिंदु मानुन त्यांच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेणे आवश्यक आहे. पण यापासुन आपण कुठेतरी दूर गेलो आहोत त्यामुळे या सभागृहाचे कितीतरी निर्णय शहराच्या आजच्या परीस्थितीला कारणीभूत आहेत अशी सामान्य नागरीकांच्या भावना आहेत. या शहरातल्या नागरीकांच्या मालकीच्या खुल्या जागांवर कार्यक्रम करण्यासाठी शहरातल्या नागरीकांना हजारो रूपये मोजावे लागतात. या शहराने स्वस्तात व्यवसाय करण्यासाठी दिलेल्या जागांचा सामान्य माणसाला कुठलाही फायदा होत नाही. या शहरात समान आकाराच्या घरांना अत्यंत टोकाचा फरक असलेली घरपट्टी आहे. ६८ चौरस किलोमीटर क्षेत्राच्या या शहरात पाचशेच्या वर खुल्या जागा असतांना नागरीकांना जॉगींग पार्क नाही. वृध्दांसाठी नाना नानी पार्क नाहीत, बाल गोपाळांसाठी खेळणी नाहीत पण या सभागृहाच्या निर्णयाने मूठभर संस्थांकडे शहराच्या मालकीच्या जागा, इमारती उत्पन्न कमविण्यासाठी वापरात आहेत. यावर आपण कधीच विचार करणार नाहीत का ? मला माहीत आहे मी येथे असे म्हणणे धाडसाचे आणि मलाच माझ्या हाताने मृत्युदंड देण्यासारखे आहे. पण मला माझी सद्‌विवेकबुध्दी हे सर्व या सभागृहासमोर मांडण्यासाठी भाग पाडत आहे. कारण हे मी स्पष्टपणे सांगितल्याशिवाय या सभागृहासमोर सामान्य माणसाच्या भावना येणार नाहीत, याची मला खात्री झाली आहे.

कदाचित मी उद्या मी येथे असेन किंवा कदाचित नसेन, कदाचित मी येथे मांडत असलेल्या भावनांचा आदर होईल, कदाचित त्यांना पायदळी तुडवून मला शहराच्या बाहेरचा रस्ता दाखविण्यात येईल. काहीही असो पण हे शहर या प्रश्नांच्या बाहेर येण्यासाठी जे जे करणे शक्य होते, ज्या ज्या वेळी या सभागृहाला वस्तुस्थिती दाखविण्याची आवश्यकता होती तेथे मी दाखविलेली आहे पण तरीही माझे प्रयत्न कमी पडले, मी अपयशी झालो, मी थकलो म्हणूनच मी आज या शहरातल्या सामान्य माणासाला साकडे घालतो की बाबा रे ! आता तुच सर्व शक्तीमान आहे आणि तुच काहीतरी करण्याची आकांक्षा आहे आणि आता तूच या शहराला संकटातून वाचवू शकतोस. या शहरात सर्वश्रेष्ठ असलेल्या पण स्वत:ला सामान्य माणुस म्हणवून घेणा-या तूच सर्वश्रेष्ठ आहे. आता तूच तुझे विश्वरूप दाखव तुझी अगाध शक्ती दाखव आणि या सभागृहाला दिशा दाखवून तूच आता आम्हाला या प्रश्नांमधून बाहेर काढ. कर्ज फिटु शकते विकास होवू शकतो, हे तुला आणि आम्हाला सर्वांना समजले आहे, हे मृगजळ नाही तर वास्तव आहे, आम्हाला ते प्रयत्न करून शक्य झाले नाही, आता तूच ते शक्य करून दे, हे शहर, याच भविष्य आता तुझ्याच हातात आहे. प्रयत्न करूनही, प्रचंड वेळ देवूनही मला यात अपयश आले, कर्ज फेडीच स्वप्न दाखवूनही मी ते पुर्ण करू शकलो नाही या बद्दल मला माफ कर.

या शहरातल्या सामान्य नागरीकांची मी माफी मागुन मी सभागृहाचा खालील प्रमाणे अर्थ संकल्प सादर करीत आहे.

**---o o---**

या अर्थसंकल्पात चालु वित्तीय वर्ष सन २०१४-१५ चा अर्थसंकल्पीय सुधारीत अंदाज सादर करीत आहे. उत्पनाच्या मर्यादेत खर्च करणे अपेक्षीत असल्याने सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाज पत्रक सादर करतांना उत्पन्नाची सध्याची स्थिती पाहुनच सुधारीत अंदाज पत्रकामध्ये खर्चा करीता तरतुद ठेवण्यात आली आहे. मागील वर्षी निश्चित करण्यात आलेल्या उद्दीष्टांपैकी साध्य करण्यात आलेल्या बाबींचा तसेच प्रत्यक्ष उत्पन्न विचारात घेऊन प्रस्तावित अर्थ संकल्पात उद्दीष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

**सन २०१५-१६ च्या अर्थ संकल्पामध्ये महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीची प्रक्रिया लक्षात घेऊन त्या प्रमाणात खर्चाचे नियोजन करण्यात आले आहे.**

**जमा बाजू -**

सन २०१५-१६ चे प्रस्तावित अर्थ संकल्पात एकुण आय रू ४०३.१५ कोटी अपेक्षीत आहे. त्यात एल.बी.टी.पासुन रू. ८६.५० कोटी, पारगमन शुल्क १५ ऑगस्ट २०१४ पासून शासनाने बंद केल्याने मनपाचे अंदाजित रू १८.०० कोटीने उत्पत्र कमी झाले आहे, मालमत्ता व पाणीपट्टी करापासुन रू ७०.८७ कोटी, खुला भखंडावरील करा पासुन रू. २६.७८ कोटी, किरकोळ वसुली रू १०४.९९ कोटी असे एकुण मनपा स्वउत्पन्नाचे रू २८९.१४ कोटी अपेक्षित उत्पन्न आहे. याशिवाय भाग २ मध्ये शासनाने जर विविध योजना मंजुर केल्या व त्यापोटी निधी दिल्यास अश्या निधी पासुन रू ११४.०१ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. सदर योजना उदा. पाणीपुरवठा योजना या मंजुरीच्या अत्यंत प्राथमिक अवस्थेत असुन या योजनांचा पाठपुरावा करण्याचे धोरण या आर्थिक वर्षात आखणार आहे. म्हणजेच ख-या अर्थाने मनपाचे हे अंदाजपत्रक रू २८९.१४ कोटी रुपयाचे असुन शासनाच्या योजना व अनुदाने यांची रक्कम प्राप्त झाल्यास सदर अंदाजपत्रक हे रू ४०३.१५ कोटी रुपयांचे राहील. तसेच विविध मनपा निधी व विविध शासकीय निधी मिळुन एकुण अंदाजपत्रक रू ५३०.२१ कोटी रुपयांचे राहील. परंतु महानगरपालिकेचे स्थापनेपासुन प्रत्यक्ष उत्पन्नाची आकडेवारी बघता रू १६० कोटी पेक्षा जास्त उत्पन्न कोणत्याही वित्तीय वर्षात प्राप्त झालेले नाही.

**खर्च बाजू**

सन २०१५-१६ चे प्रस्तावित अर्थ संकल्पात एकुण अपेक्षीत खर्च रू ३९५.१८ कोटी असुन यात कर्मचा-यांचे वेतनावर खर्च रू ७०.४९ कोटी,सेवानिवृत्ती वेतन खर्च रू २०.४० कोटी,नविन रस्ते, नविन गटारी व विविध कामांच्या सुस्थीती व दुरुस्तीचे खर्चा साठी रू १५.०० कोटी व विज बिल व इतर आवश्यक बाबींकरीता रू १० कोटी, भांडवली खर्च रू ३२.१० कोटी व शासनाने जर विविध योजना मंजुर करुन निधी मनपास उपलब्ध करुन दिल्यास उर्वरीत इतर बांबीकरीता खर्च रू २४७.१९ कोटी अपेक्षीत आहे. शासनाच्या योजना व अनुदाने यांची रक्कम प्राप्त झाल्यास सदर अंदाजपत्रकीय खर्च हा रू ४०३.१५ कोटी रुपयांचे राहील. तसेच विविध मनपा निधी व विविध शासकीय निधी मिळुन एकुण अंदाजपत्रकीय खर्च रू ५३०.२१ कोटी रुपयांचे राहील. परंतु महानगरपालिकेचे स्थापनेपासुन प्रत्यक्ष खर्चाची आकडेवारी बघता रू १५० ते १५५ कोटी पेक्षा जास्त खर्च कोणत्याही वित्तीय वर्षात झालेला नाही.

स्थायी समिती व महासभेने अंतिमत: मंजुरी दिलेल्या सन २०१४-१५ चे अंदाज पत्रकातील अपेक्षित धरण्यात आलेले उत्पन्न व खर्चाच्या तरतुदीबाबत एप्रिल २०१४ ते नोहेंबर २०१४ या आठ महिन्यातील प्रत्यक्ष उत्पन्न व प्रत्यक्ष खर्चाची पडताळणी करता तसेच मागील तीन वर्षातील सरासरी उत्पन्न लक्षात घेता काही बाबीवरील अपेक्षित उत्पन्न कमी प्रमाणात आलेले आहे. त्यामुळे लेखाशिर्षानुसार आठ महिन्यातील प्रत्यक्ष झालेला जमा खर्च व पुढील चार महिन्यातील अपेक्षित जमा खर्च लक्षात घेवुन जमा खर्चाच्या तरतुदी सुधारीत करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार सविस्तरपणे सुधारीत तरतूदी या सोबतच्या विवरणपत्रात स्थायी समितीस सादर करण्यात येत आहेत.

**मालमत्ता कर**

**मालमत्ता कराच्या अभिलेख्यात सुधारणा करणे, अद्यावत करणे**

१. सन २०१५-१६ मध्ये मालमत्ता कराच्या दरात कुठलीही वाढ प्रस्तावित करण्यात येत नाही. सध्याच्या जळगाव शहरात मालमत्ता कराच्या आकारणी वेगवेगळ्या असल्याच्या नागरीकांच्या मोठ्या प्रमाणावर तक्रारी आहेत. त्यामुळे सध्याच्या मालमत्ता कराचे आकारणी पुस्तकाचे अखेरचे नवीनीकरण सन २००२-०३ वर्षात झालेले आहे. महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ०८ कराधान नियमाच्या कलम २१ अन्वये मालमत्ता कराच्या आकारणी पुस्तकाचे दर ५ वर्षातून १ वेळेस नवीनीकरण करणे आवश्यक आहे. अंतिम नवीनी करणापासून शहराच्या विविध भागाचे सुधारणा व

बदल विविध प्रकारे झाला आहे जो आकारणी पुस्तकात प्रतिबिंबित होणे आवश्यक आहे या करीता सन २०१५-१६ च्या मालमत्ता कराचे नगररचना विभागाच्या सहाय्याने कर योग्य मुल्य निर्धारण करून नवीन आकारणी पुस्तक तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सदर आकारणी पुस्तक तयार करतांना कराचे जुने दर कायम ठेवण्याचा प्रस्ताव आहे. कराच्या आकारणी पुस्तकात करण्यात येणारे बदल हे करातील तफावत दुर करण्यासाठी आहेत. तांबापुरा व गणपती नगर भागातील नागरीक ज्या परीस्थितीत राहत आहेत त्या परीस्थितीनुसार कर असावेत, या नगरांचे वस्तींचे नाव उदाहरण दाखल घेतले आहे. हे करीत असतांना जाहीर सुचना व वैयक्तीक सुचनांनुसार सर्व नागरीकांना कळविण्यात येणार आहे. स्वत:च्या वैयक्तीक माहीती बददलच नव्हे तर ईतरांच्या माहीत असलेल्या माहीती बददल ही आक्षेप नोंदवून ही प्रक्रिया अत्यंत नि:पक्षपाती पणे करण्यासाठी सहकार्य करावे हे या सभागृहाच्या माध्यमातून मी सर्व नागरीकांना आवाहन करीत आहे. या प्रक्रियेत कुणावरही अन्याय होणार नाही याची मी ग्वाही देतो. या प्रक्रियेत कुणावरही अन्याय करणारा आमचा कर्मचारी आढळून आल्यास त्यास तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्यात येईल याची मी ग्वाही देतो.

२. एप्रिल महीन्यात मालमत्ता कराचा भरणा करणा-या नागरीकांस सध्या ७ टक्के सुट देण्यात येते त्याऐवजी ८ टक्के सुट करण्याचा प्रस्ताव देण्यात येत आहे.

३. जळगाव शहरातील स्त्री जन्माचा दर कमी असुन मुलीच्या जन्माचा गौरव करण्याच्या उद्देशाने एक किंवा दोन मुली नंतर शस्त्रक्रीया केल्यास मालमत्ता कराच्या रकमेत आगाऊ भरणा करणा-यास इतर सुट व्यतिरीक्त ०२ टक्के अधिकची सुट देण्याचा प्रस्ताव देण्यात येत आहे.

४. १ एप्रिल पासून शॉप ॲक्ट प्रमाणे व्यवसायिक वापर करणा-या मालमत्तेस व्यवसायिक आकारणी करण्यात येईल मात्र शॉप ॲक्ट परवाना निवासी जागेत असेल व सदरचा व्यवसाय हा महीला बचत गट किंवा घरगुती महीला उद्योग, सुशिक्षित बेरोजगार ३५ वर्षे वयोमर्यादेपर्यन्तच्या युवक व महीला करीत असल्यास त्यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने आगाऊ एप्रिल महीन्यात भरणा केल्यास ५ टक्के अतिरीक्त सुट देण्याचे धोरण ठरवून मान्यता देण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

५. शहरात एम आय डी सी आहे मात्र नवीन उद्योग येत नाहीत, त्यामुळे नवीन उद्योग येणार असल्यास नवीन उद्योगांनी आगाऊ कर भरणा एप्रिल महीन्यात केल्यास प्रथम वर्षास मालमत्ता करात अतिरीक्त ५० टक्के सुट, दुसरा वर्षास २५ टक्के व तदनंतर पुढील ३ वर्षासाठी अतिरीक्त १० टक्के सुट देण्याचा प्रस्ताव देण्यात येत आहे.

६. साामान्य नागरीक देखील पुर्णत: कराचा भरणा करत आहे मात्र काही मनपा मालकीच्या व्यापारी संकुल, आस्थापना यामध्ये काही प्रमाणात भाडे रकमेत सुट देण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचेकडून कर आकारणी कमी प्रमाणात होत आहे त्यामुळे सदर मालमत्ता कर आकारणी सर्व सामान्यांप्रमाणेच एकसमान पध्दतीने कर आकारण्याचा प्रस्ताव देण्यात येत आहे.

७. मालमत्ता कराची आकारणी सध्या जुन्याच पध्दतीने सुरू असुन सदरची आकारणी भांडवली मूल्यावर आधारीत पध्दतीने करण्यासाठी महानगरपालिकेच्या सध्याच्या अभिलेख्यात असलेल्या माहीतीला अद्यावत करण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आलेले आहे.त्यानुसार महानगरपालिका कर्मचारी यांचे मार्फत माहीती अद्यावत करून मालमत्ता कराची आकारणी भांडवली मूल्यावर करण्यासाठी व महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या वाढीसाठी पूर्व तयारी करून ठेवण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्याबाबत सविस्तर अहवाल सभागृहासमोर लवकरच सादर करण्यात येईल.

## खुला भुखंड कराच्या आकारणी व वसुलीचे विकेंद्रीकरण

खुल्या भुखंडाचे सर्वेक्षण करण्याची प्रक्रिया मागील वर्षाच्या अंदाजपत्रकात प्रस्तावित करण्यात आलेली होती त्यानुसार प्रक्रिया पुर्ण करून खुला भुखंड कराची प्रभाग निहाय वर्गवारी व खुला भुखंड कराची बिले मनपाच्या संकेत स्थळावर प्रभाग निहाय, रहीवासी भागा निहाय देखील स्वतंत्रपणे देण्यात आलेले आहेत.

खुला भुखंड कराचे आपले धोरण हे सामान्य माणसाला अत्यंत त्रासदायक, व स्पष्ट नाही हे आपणा सर्वांना मान्य करावे लागेल. आज ब-याच ठिकाणी खुला भुखंड कर अधिक येतो तर त्यावर बांधकाम केल्यानंतर मालमत्ता कर कमी येतो हे आपल्या सर्वाच्या कानावर ब-याचदा आले आहे त्यामुळेच खुला भुखंड कर वसुलीचे प्रमाण कमी आहे यामुळे या बाबत स्पष्ट धोरण असण्याची आवश्यकता आहे. अंतिम रेखांकन केलेला अभिन्यास धारकांस जवाबदार धरण्याची आवश्यकता आहे. जोपर्यन्त शहरातील अभिन्यासांची विक्री होवून नवीन मालकांचे नाव लागत नाही, वा त्याबाबत विकासकाकडून विक्री

केल्याचा सक्षम पुरावा सादर केला जात नाही तोपर्यन्तचा खुला भुखंड कर अभिन्यास विकसित करणा-या विकासकाकडून भरून घेण्यात येईल व अश्या नोंदी व पत्त्याची खात्री दिली जात नाही तो पर्यन्त अशी वसुली सुरू राहील.

जळगाव महानगरपालिका हद्दीत आकारण्यात येत असलेल्या खुला भुखंड कराची वसुली करतांना नागरीकांना कराचा भरणा करणेसाठी कार्यालय प्रभागात उपलब्ध झाल्यास नागरीकांना कर भरणे सोयीचे होईल यास्तव खुला भुखंड कराची मागणी प्रभाग निहाय तयार करून आकारणी करण्यात येणार आहे. त्यामुळे खुला भुखंड कराच्या वसुलीत वाढ होईल. अश्या बाबींचा विचार करून खुला भुखंड कर आकारणीचे सुस्पष्ट धोरण निश्चित करून देण्याची प्रस्तावन करण्यात येत आहे.

## महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनेच्या सुधारणांबाबत

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान अंतर्गत महानगरपालिकेने पाणी पुरवठा विषयक सुधारणांची कामे हाती घेतलेली आहे. या कामात ग्राहक सर्वेक्षण, जी आय एस मॅपिंग, हायड्रोलिक मॉडेलिंग, जल लेखापरीक्षण, उर्जा लेखापरीक्षण, मीटरींग ही कामे हाती घेतलेली आहेत त्यापैकी ग्राहक सर्वेक्षणाचे काम, मीटरींग, जी आय एस मॅपिंगचे काम मक्तेदाराने पुर्ण केलेले आहे. ग्राहक सर्वेक्षणात १७,२९४ नळ संयोजने जादा आढळून आलेली असुन प्रत्येक प्रभाग समिती मार्फत या संयोजनांबाबत तपासणीचे काम सुरू आहे. तसेच पाणी पुरवठा बिलांचे प्रभाग समिती निहाय संगणकीकरण करण्यात आलेले असुन एप्रिल २०१५ पासुन पाणी पुरवठा कराची बिले संगणकीकत पध्दतीने वितरीत करण्यात येतील. हायड्रोलिक मॉडेलिंगचे काम प्रगतीपथावर सुरू असुन जल व उर्जा लेखापरीक्षणामुळे नक्कीच मोठया पाणी पुरवठा संसाधनांचा देखभाल व दुरूस्ती च्या खर्चात बचत होईल. सर्व भागात नागरीकांना समान दाबाने पाणी पुरवठा होण्यासाठी करावयाच्या दुरूस्तीच्या उपाययोजना व कामे लवकरच शासनाच्या मान्यतेने हाती घेण्यात येतील. त्यामुळे अनधिकृत नळ संयोजन असलेल्या ग्राहाकांना ३१ मार्च २०१५ पर्यन्त अशी नळ संयोजने अधिकृत करून घेण्यास दंड आकारण्यात येणार नाही असा प्रस्ताव देण्यात येत आहे.

## मेहरूण तलावाचे संवर्धन

महाराष्ट्र शासनाने राज्य नदी संवर्धन योजना जाहीर केलेली असुन या अंतर्गत तलावाच्या संवर्धनासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत मार्गदर्शक सुचना आहेत. मेहरूण तलावाच्या आजू बाजूस निसर्गरम्य परीसर असुन त्याजवळच महानगरपालिकेचे शिवाजी उदयान आहे. महानगरपालिकेने विकसीकरणाचा प्रस्ताव शासनास सादर केलेला होता. सदर प्रस्तावात तांत्रिक बदल जसे तलावाचे मजबूतीकरण, तलावातील पाण वनस्पतीचे पुनरूज्जीवन ई संवर्धनाच्या कामांचा समावेश करण्याच्या सुचना महानगरपालिकेस शासनाने केलेल्या आहेत. त्यानुसार महानगरपालिकेमार्फत सर्वेक्षण व सुधारीत अहवाल तयार करून सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. या आर्थिक वर्षात सदर निधी प्राप्त करून घेवून कामास सुरूवात करण्याची कार्यवाही केली जाईल. सदर काम जिल्हा विकास योजनेतून मंजूर करण्यात आलेले आहे सद्यस्थितीत मोजणीची प्रक्रिया पुर्ण झाल्यावर कामास सुरूवात करण्यात येईल. या बाबत अधिकचा निधी उपलब्ध करून देण्याबाबत मा.पालकमंत्री महोदय, यांनी तयारी दर्शविलेली आहे. सदर परीसरास वारसा स्थळाचा दर्जा देण्याबाबत प्रयत्न करण्याचा प्रस्ताव देण्यात येत आहे.

## लोक सहभागातुन बगिच्यांचा विकास / खुल्या जागांचा विकास

१. जळगाव महानगरपालिका हद्दीत खुल्या जागा मोठ्या प्रमाणावर रिक्त असून त्याचा वापर हा सार्वजनिक हित, पर्यावरण रक्षण, संवर्धन करण्याच्या प्रमुख उद्देशाने महानगरपाालिकेच्या खुल्या जागेत वृक्ष संवर्धन लागवडीसाठी सामाजिक संस्थानी जवाबदारी घेतल्यास १० फुट बाय १० फुट पत्र्याचे वॉचमन शेड उभारण्यास परवानगी देण्यात येईल व पाणी, लाईट सुविधा व तारेचे कुंपण महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात येईल, अश्या जागा वापरास मनपा तर्फे परवानगी देतांना या जागेत सर्व नागरीकांना विनामूल्य प्रवेश राहील व व्यावसायिक वापर होणार नाही या अटीवरच परवानगी देण्यात येईल. त्यामुळे वृध्दांना विरंगुळा, फिरण्यासाठी ठिकाण, लहान बालकांसाठी खेळण्याची ठिकाणे तयार होतील व त्यामुळे रस्त्यांवर बालकांच्या अपघाताचे प्रमाणही कमी होईल. वॉचमन नियुक्त करण्याची जवाबदारी संबंधित जवाबदारी घेणा-या संस्थेची राहील.

२. खुल्या भुखंडावर ब-याच संस्था या विनामूल्य विकसित करण्यास उत्सुक असतात, खुल्या भुखंडात आजू बाजूच्या रहीवाश्यांनी, सामाजिक संस्थानी सामाजीक जाणीव ठेवून पक्के स्वरूपात जॉगिग पार्क स्वखर्चाने उभारण्याची तयारी दर्शविल्यास महानगरपालिका वर्षाचे शेवटी रू.५०००/- अनुदान देईल. १० फुट बाय १० फुट पत्र्याचे वॉचमन शेड उभारण्यास परवानगी देण्यात येईल व पाणी, लाईट सुविधा व तारेचे कुंपण महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात येईल या मध्ये वृध्द / जेष्ठ यांनी सहभाग घेतल्यास त्यांना प्राधान्य देण्याची प्रस्तावना करण्यात येत आहे. वॉचमन नियुक्त करण्याची जवाबदारी संबंधित जवाबदारी घेणा-या संस्थेची राहील.

३. मोठया स्वरूपाच्या बगिच्यांचा विकास उद्योजक स्वनिधी वापरून देगणी स्वरूपात विनामूल्य करण्याच्या दृष्टीने तयार असल्यास तसेच सदर बगिच्याचा देखभाल व दुरूस्ती करण्यास तयार असल्यास अश्या कंपनीस त्या कंपनीची बगिच्यातील ठराविक ठिकाणी जाहीरात करण्यास विनामूल्य परवानगी देण्याची प्रस्तावना करण्यात येत आहे. परंतु अश्या बगिच्याचा वापर हा फक्त बगिच्यासाठी, व सर्व नागरीकांना ठरवून दिलेल्या वेळेत विनामूल्य राहील.

४. महानगरपालिका अथवा तत्कालीन नगरपालिकेने इतर प्रयोजनासाठी अश्या खुल्या जागा इतर संस्थांना दिल्या असतील आणि त्या दिलेल्या अटी शर्तीत काम करीत असतील तरीही सदर परीसरातील अभिन्यास धारकांचा हक्क हा अबाधित व कायम राहील व असे जॉगींग पार्क व वृक्ष लागवडीसाठी यापुर्वीचे सर्व ठराव अधिक्रमीत करून परवानगी देण्यात येईल असा प्रस्ताव देण्यात येत आहे.

## विकासक तत्वावर विकसित करावयाचे प्रकल्प

१. जळगाव शहरातील स्मशान भुमीत सद्यस्थितीत लाकडांचा वापर दहनासाठी करण्यात येतो. पर्यावरणाच्या दृष्टीने लाकडांचा वापर कमी केल्यास / थांबविल्यास पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर संवर्धन होईल. तसेच गरीब नागरीकांना या मुळे दिलासा मिळेल यास्तव लोकसहभागातून विद्युत दाहीनी पुरविण्यात आल्यास महानगरपालिका स्वागत करेल यासाठी स्वयंसेवी संघटना व उद्योजक यांना यथाशक्ती मदत करेल.

२. महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा विकसित करणे साठी विकासक तत्वावर महानगरपालिकेच्या आर्थिक फायदा व उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून विचार करून निर्णय घेण्यात येणार आहे. विकासक तत्वावर विविध वाढीव भागातील चौकांचा विकास झालेला नाही. सदर बाबतीत विकासक यांना विनंती करून त्यांचेमार्फत चौक विकसित करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात येणार आहे.

३. पीपीपी वर निसर्गरम्य परीसर लाभलेले मेहरूण तलावाजवळील शिवाजी उद्यान व गिरणा पंपींग जागा विकसित करण्यात येतील. त्यामुळे सदर जागांचे रक्षण, वृक्ष संवर्धन, पर्यावरण संवर्धन, नागरीकांसाठी पर्यटनाचे, भेट देण्याचे ठिकाण तयार होवून त्यामुळे शहराच्या नावलौकीकात भर होईल.

४. भास्कर मार्केट मधील गाळे हे जुने असुन या ठिकाणी जुन्या व्यवसायिक दुकानदारांना सवलतीच्या दरात दुकाने देवून सदर व्यापारी संकुल विकासक तत्वावर विकसित करण्यात येणार आहे तसेच अश्या जुन्या सर्व प्रकारच्या व्यापारी संकुलाचा विकासक तत्वावर विकास करण्याची प्रस्तावना करण्यात येत आहे.

५. जुने नगरपालिका व सानेगुरूजी रूग्णालयाची जागा आरक्षित प्रयोजनासाठी आरक्षित आहे त्याव्यतिरीक्त वापर अनुज्ञेय नाही त्यामुळे या जागा विक्री करण्याचा निर्णय घेण्याची प्रस्तावना करण्यात येत आहे.

## महानगरपालिका मालमत्ता / खुली जागा

१. सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या व्यापारी संकुलातील गाळयांचे करार संपलेले आहेत नवीन करार अद्याप करण्यात आलेले नाहीत, नवीन फुले मार्केट व जुने फुले मार्केट येथील गाळे धारकांनी नापरतावा रक्कम भरणा केल्यास दोन्ही व्यापारी संकुलांचे नुतनीकरण आधुनिक सुविधांसह करण्यात येईल तसेच नवीन फुले मार्केट मध्ये सरकते ईलेट्रोनिक जिने बसविण्याची प्रस्तावना करण्यात येत आहे. तसेच महानगरपालिकेच्या सर्व संकुलांना -----प्रस्तावित करण्यात येवून यापुर्वी नगरपालिकेने / महानगरपालिकेने केलेले सर्व ठराव अधिक्रमीत करून या सर्व संकुलातील मूळ नकाशांच्या व्यतिरीक्त असलेले अनधिकृत बांधकाम हटविण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच सर्व संकुलातील गाळ्यात समानता यावी या दृष्टीने तत्कालीन नगरपालिका अधिनियम अथवा आजच्या महानगरपालिका अधिनियमानुसार ज्या

कालावधीसाठी गाळे वापरासाठी गाळे देता येतात त्याच कालावधीसाठी गाळ्यांची मुदत मग ती करारनाम्यात काहीही नमूद असो सिमीत करण्यात येत आहे.

२. महानगरपालिकेच्या हद्दीत सामाजिक बांधीलकी रहावी सामुहीक विवाहांना प्राधान्य मिळावे यासाठी खुल्या जागा सामूहीक विवाहांसाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्याची प्रस्तावना करण्यात येत आहे. मात्र सामूहीक विवाह आयोजन करणा-यांनी कायदेशीर नियम व कार्यक्रमानंतर सफाईची कामे करण्याची अट बंधनकारक राहील.

३. महानगरपालिकेचे खुले भुखंड तत्कालीन नगरपालिकेने विविध संस्थांना देण्यात आलेले आहेत त्याचा व्यवसायिक वापर होत आहे व त्यापैकी ब-याच जागांवर व्यावसायिक आकारणी करण्याच्या नागरीकांच्या तक्रारी आहेत, त्यामुळे असे भुखंड तातडीने ताब्यात घेण्यात येणार आहेत, तसेच नागरीकांनाही अश्या भुखंडावर कोणत्याही प्रकारचे भाडे कर देवू नये.

## किरकोळ वसुली

१. सकाळच्या वेळी बरेच नागरीक हे फिरण्यास व्यायामासाठी बगिच्यात येत असतात अश्या बगिच्यांच्या ठिकाणी रस्त्यांवर बगिचा व तत्सम ठिकाणी ज्युस विक्री करणा-यांकडून दररोज १० रू डेली बाजार फी आकारण्यात येते. मात्र विक्री करणारी अशी व्यक्ती ही नागरीकांच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने दररोज ठराविक वेळेत अल्प नफ्यावर कार्यरत असते याचा विचार करून अश्या आर्युवेदीक स्वास्थवर्धक ज्यूस विक्रेते 'जसे कारले, आवळा, बिट' यांना डेली बाजार वसुलीत सुट देण्याची प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

२. रस्त्यावरील किरकोळ वृत्तपत्र विक्रेते यांना डेली बाजार वसुली फी मधून सुट देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

३. महानगरपालिकेने मोठ्या स्वरूपात घरकुलांचे निर्माण केलेले आहे त्याचेकडून भाडे आकारणी होत नाही त्यामुळे घरकुल हस्तांतरणाबाबत उपविधी तयार करून शासनाची मान्यता घेवून थकबाकी वसुलीची कार्यवाही करणेची देण्याची प्रस्ताव ठेवण्यात येत आहे. घरकुलांत प्रत्यक्ष राहणा-या नागरीकांस त्याचा निश्चितच फायदा होईल.

४. फेरीवालापैकी स्थायी फेरीवाले हे मोठ्या प्रमाणावर रस्त्याची जागेचा वापर करीत असतात सदर फेरीवाला फेरीने विक्रीची परवानगी असुन देखील असे विक्रेते स्थायी स्वरूपात एकाच ठिकाणी थांबतात त्यामुळे इतर फेरीवाले यांचेवर अन्याय होत असल्याने स्थायी प्रकारच्या फेरीवाला यांच्या कडून आकारावयाच्या फी रू.२०/- वाढविण्याचा प्रस्ताव ठेवण्यात येत आहे. तसेच न्याय्य फेरीवाल्यांना रू.१०.०० प्रमाणे फी नेहमीप्रमाणे आकारण्याची देण्याची प्रस्तावना करण्यात येत आहे.

## आरोग्य विषयक

मोकाट कुत्र्यांचा प्रश्न गंभीर झालेला आहे. त्याबाबत मोठ्या प्रमाणावर नागरीकांच्या तक्रारी आहेत या सभागृहात त्यावर
अनेकदा चर्चा झाली आहे. परंतु त्यावर उपाय योजना करण्यास आपण अपयशी ठरलो आहोत. र्निबीजीकरण करणे हाच यावर एकमेव उपाय आहे. महानगरपालिकेचा यापुर्वी मोकाट कुत्रांवर कार्यवाही करण्याचा अनुभव पाहीला असता त्यातून प्रत्यक्षात समस्येचे निराकरण झालेले नाही. मागील वेळेस करण्यात आलेली निर्बिजीकरणाची कार्यवाही पुर्णत: फोल ठरलेली आहे. त्यामुळे अश्या मोकाट कुत्र्यांना टॅगिंग करणे त्यांना रेबीज प्रतिबंधक लस देणे व निर्बिजीकरण करणे याची एकत्रित मोहीम हाती घेणे आवश्यक आहे. त्यासाठी डॉग व्हॅन अद्यावत करणे त्यासाठी पुरेसे मनुष्यबळ देणे आवश्यक आहे. शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यांशी चर्चा केली असता जी पी एस ट्रॅकिंग चे टॅगिंग, रेबिज लस व निर्बिजीकरणाचा खर्च अंदाजे रू.६००/- प्रति कुत्रा असा येवू शकेल. खाजगी कंपनीकडून करून घेतल्यास कार्यक्रम कागदावरच राहतो व महानगरपालिकेवर आर्थिक भार येतो. त्यामुळे सदर कार्यक्रम आवश्यक सुविधा साधने यांची व्यवस्था करून शासकीय पशुवैद्यकीय अधिकारी यांचे कडून करून घेण्याचा प्रस्ताव ठेवण्यात येत आहे. हे करण्यासाठी वेगळ्या आर्थिक तरतूदीची आवश्यकता असेल. घरात कुटुंबांच्या सदस्याप्रमाणे कुत्र्यांचे संगोपन करणा-यांची संख्या मोठी आहे. या मुक्या जनावरावर ते मनापासून प्रेम करतात आणि हजारो रूपये त्यावर खर्च करतात. हे प्रेम या नागरीकांनी मोकाट कुत्र्यांवरही करावे आणि या शहराला या प्रश्नातून बाहेर पाडण्यास मदत करावी. शहरात पाळीव कुत्र्यांच्या संख्येच्या दुप्पट मोकाट कुत्र्यांची संख्या असावी असा अंदाज आहे. त्यामुळे ही मोहीम संपेपर्यन्त शहरातील पाळीव कुत्र्यांना प्रति महीना रू.५०/- प्रमाणे कर लावण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यामुळे पाळीव कुत्रे व प्राणी यांचेवर एकत्रित वर्षासाठी रू.६००/- कर आकारणी प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर खर्चातून रस्त्यांवरील कुत्र्यांचे जी पी एस टॅगिंग, निर्बिजीकरण, लसीकरण करण्यात येईल. परंतु जे

व्यक्ती / संस्था रस्त्यांवरील कुत्रे, जनावरे, नैसर्गिक रित्या जखमी पशु पक्षी दत्तक घेवून त्यांचे संगोपन करतील त्यांना या करातून सूट देण्याची प्रस्तावना करण्यात येत आहे.

## जन्माची नोंद

महानगरपालिका हद्दीतील नवीन जन्म झालेल्या बालकांच्या नोंदी करतांना जन्म दाखल्याची प्रथम प्रत मोफत देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

## दवाखाने

१. जळगाव शहर जगभरात सुवर्ण नगरी म्हणून प्रसिध्द आहे. महाराष्ट्रात सदर शहर वैद्यकीय व्यवसायासाठी प्रसिध्द आहे. मागील आर्थिक वर्षात २०१४-२०१५ मध्ये स्थायी समिती व महासभेत महानगरपालिकेच्या दवाखाने चालिविणेबाबत जनतेच्या हिताचे प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत. शहरातील तज्ञांनी महीन्यातून किमान २ तास महानगरपालिकेच्या दवाखान्यात उपचार देणेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

२. सद्यस्थितीत वैद्यकीय औषधांचा खर्च हा मोठ्या प्रमाणावर येत असतो, महानगरपालिकेच्या रूग्णालयात स्वस्त दरात औषधींचा पुरवठा करता यावा यासाठी जेनेरीक मेडीसीन विक्री करण्यासाठी कोणत्याही नागरीकांनी / संस्थांनी ना नफा -ना तोटा तत्वावर विक्री करण्याची तयारी दर्शविल्यास महानगरपालिकेच्या दवाखान्यात नाममात्र भाड्यावर जागा देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

## घन कचरा प्रकल्प

सद्यस्थितीत घन कचरा प्रकल्प बंद अवस्थेत आहे. सदर प्रकल्पास सुरू करणे कामी कायदेशीर प्रक्रिया सुरू झालेली आहे त्यामुळे या कामी बराच विलंब लागण्याची शक्यता आहे. अश्या परीस्थितीत घन कच-याच्या विल्हेवाटीसाठी पर्यावरणाच्या समतोलाच्या दृष्टीकोनातून नवीन उपाय योजना करण्याची नितांत आवश्यकता आहे. सद्यस्थितीत भारत सरकार कडून स्वच्छ भारत मिशन सुरू करण्यात आलेले आहे. घनकचरा विल्हेवाटीसाठी विविध स्तरावरून प्रयत्न सुरू आहेत त्यानुसार मनपा घनकचरा विल्हेवाटीसाठी वेगळया शास्त्र शुध्द पध्दतीचा अवलंब करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यावर पी पी पी वर प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यावरही निर्णय घेण्यात येईल व येत्या वर्षात त्यावर निश्चित असा तोडगा काढण्यात येईल.

## विकास कामे हाती घेण्याचा निकष

महानगरपालिकेची होत असलेली विकास कामे ही शासनाच्या निधीवर अवलंबून असतात. शासकीय निधी ज्या प्रमाणात प्राप्त होत असतो त्यात सर्व भागांचा विकास करणे शक्य नसते. या बाबत नागरीकांनी वेळोवेळी हरकती घेतलेल्या आहेत. सदर हरकतींच्या अनुषंगाने समान विकास व आवश्यक ठिकाणची कामे हाती घेण्यासाठी कामांची प्राथमिकता ठरविणे आवश्यक असुन त्यानुसार कामे यापुढे हाती घेण्याची आवश्यकता आहे त्यामुळे या पुढे कामे मंजूर करण्याआधी संबंधित विभागाकडून कामांची निकड ठरवून त्यानुसार काम मंजूर करण्याची प्रस्तावना करण्यात येत आहे.

## नागरीकांच्या सोईसाठी कार्यालयांचे स्थलांतर

महानगरपालिकेच्या प्रभाग -१ चे कार्यालय १७ मजली इमारतीत आहे त्यामुळे नागरीकांना लिफ्टचा वापर करून कामांसाठी कार्यालयात यावे लागते. त्यामुळे लिफ्टसाठी थांबणे वेळेचा अपव्यय या कारणांमुळे कार्यालय हे इतर सोयीच्या ठिकाणी स्थलांतर करणे आवश्यक आहे. प्रभाग समिती कार्यालय क्रं.०१ चे कार्यालय इतर ठिकाणी व प्रभाग क्रं.०३ चे कार्यालय गणपती नगर मधील विद्युत विभागाच्या कार्यालयाच्या इमारतीत स्थलांतर करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

## व्यायाम शाळांबाबत धोरण

महानगरपालिकेच्या व्यायाम शाळांचे बांधकाम महानगरपालिकेने केलेले असुन यात व्यायामाचे सामान व इतर सामान पुरविलेले आहे. सदर व्यायाम शाळांवर महानगरपालिकेचा अंकुश नाही व त्याच्या देखभाल दुरूस्तीबाबत सद्यस्थितीत करारही करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सदर व्यायाम शाळांचे योग्य पध्दतीने संचलन व्हावे यात सुधारणा व्हावी यासाठी महानगरपालिकेच्या विविध व्यायाम शाळा खाजगी अभिकर्त्यामार्फत चालविणेस देणेसाठी एकसमान धोरण ठरविणेत येईल. व्यायाम शाळांमध्ये महीलांसाठी स्वतंत्र सत्राची व्यवस्था करण्याची प्रस्तावना करण्यात येत आहे. तसेच पोलीस भरती, सेना भरतीसाठी तयारी करणा-या नवशिक्षित मुलांसाठी विशेष सवलतीचे दर देण्याची प्रस्तावना करण्यात येत आहे.

**नगररचना विकास शुल्काची वसुली**

१. शहरात मोठ्या प्रमाणावर दवाखाने, व्यवसायिक मालमत्ता असुन सदर मालमत्ता मालकांनी नकाशे मंजूर करतांना रहीवासी भाग दाखवून विकास शुल्काचा भरणा केलेला आहे मात्र या ठिकाणी व्यवसायिक वापर सुरू आहे. अश्या मालमत्तांनी मार्च २०१५ च्या आत महानगरपालिकेत संपर्क साधून फरकेच्या रकमेचा भरणा न केल्यास १ एप्रिल २०१५ पासून अश्या मालमत्तांचे सर्वेक्षण करून घेवून त्यांची बांधकाम परवानगी रद्द करण्यात येईल व मागील रकमेचा भरणा करण्याची कारवाही करण्यात येईल.

२. महानगरपालिकेतर्फे रेखांकनास तात्पुरती मंजूरी दिली जाते तदनंतर संबंधित जमीन मालक या जागेची बिनशेती प्राप्त करून घेतो. तदनंतर रेखांकनातील रस्ते, गटारी, ईलेक्ट्रीक पोल ई विकास कामे करतो. सदरची कामे ही योग्य स्वरूपात विकसित होत नसल्याचे वेळावेळी निदर्शनास येत आहे याचा सारासार विचार करून या कामी भुमिका बदलण्याची आवश्यकता आहे. सदरची कामे करणेपुर्वी त्यांच्या जमीनी मातीच्या प्रकाराचे शास्त्रशुध्द धारण क्षमतेचे परीक्षण करून त्या अनुषंगाने अंतर्गत रस्ते व गटारी यांचे छेद नकाशे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मंजूर करून घेतल्याशिवाय काम करण्यात येवू नये. सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रत्यक्ष मातीच्या परीक्षणानुसार अधिक काळ टिकतील अश्या स्वरूपाचे रस्ते व गटारी, पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी जमीनीच्या स्थलांकानुसार कल्व्हर्ट यांचे विविध टिपीकल डिझाईन तयार करण्यात येणार असुन त्यानुसारच जमीन मालकाकडून कामे करून घेण्यात येणार आहेत. तसेच पाणी पुरवठ्याच्या जलवाहीन्या जमीन मालकांकडून पाणी पुरवठा विभागाकडून जलवाहीनीचे हायड्रोलिक जलदाब संकल्पन तयार करून घेवून त्यानुसार कामे करून घेण्यात येणार असुन त्यानुसारच अंतिम मान्यता देण्यात येणार आहे.

**स्वच्छ भारत अभियान**

भारत सरकारने स्वच्छ भारत अभियानाची घोषणा केलेली आहे त्यानुसार आपला परीसर स्वच्छ ठेवल्यास त्यामुळे आजार, रोगराई पसरण्याचे प्रमाण निश्चितच कमी होते त्यामुळे जळगाव महानगरपालिका हद्दीत असलेल्या सर्व शाळा, कॉलेजेस यांना मी स्वच्छ भारत अभियानात सहभाग देण्याविषयी सकारात्मकता दाखवावी असे आवाहन करीत आहे. महानगरपालिका हद्दीतील सर्व शाळांनी त्यांच्या शाळेचा परीसर व त्याबाहेरील रस्त्यावर साफसफाईचा कार्यक्रम, महानगरपालिकेच्या कर्मचारी, वाहने यांचे माध्यमातून हाती घेवून केल्यास त्यामुळे मोठ्या प्रमाणावर स्वच्छ भारत अभियानाची फलनिष्पत्ती होवू शकेल तसेच झोपडपट्टी असलेल्या भागात महानगरपालिका व खाजगी वैद्यकीय व्यवसायिक यांच्या माध्यमातून आरोग्य तपासणी शिबिर हाती घेण्यात येणार आहे या बाबत वार्षिक कृती कार्यक्रम दवाखाने विभाग, आरोग्य विभागामार्फत तयार करून त्याची या वर्षात अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

स्वच्छ भारत मोहीमे अंतर्गत पी पी पी वर तसेच स्वयंसेवी संस्था व जनतेचा सहभाग घेवून प्रभागांमध्ये स्पर्धा ठेवावी व वर्षभर उत्कृष्ठ काम करणा-या प्रथम ३ प्रभागांना अनुक्रमे रू.२५,००,०००/-, रू.१५,००,०००/- व रू.१०,००,०००/- ची विकास कामे करण्यासाठी अतिरीक्त निधी उपलब्ध करून द्यावा या साठी चे धोरण ठरवून अशी स्पर्धा घेण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**हुडको व जे डी सी सी कर्जे ]**

सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात महानगरपालिकेचे खाते गोठविण्यात आलेले होते. सदर कारवाही मुंबई येथील मा. डी आर टी कोर्टाकडून करण्यात आलेली होती. सदर कारवाईच्या विरोधात महानगरपालिकेने मा.मुंबई उच्च न्यायालयात अपील केलेले होते.सदर अपीलात महानगरपालिकेस दिलासा देवून कोर्टाने काही अटी व शर्तींवर खाते

गोठविण्याच्या प्रक्रियेस स्थगिती दिलेली आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेस हुडको समेवत शासनाच्या मध्यस्थीने कर्जाची परतफेड एकरकमी करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश होते. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रस्ताव तयार करून हुडकोकडे सादर केलेले आहेत, जानेवारी २०१५ मध्ये अंतिम प्रस्ताव सादर केलेला आहे सदर प्रस्ताव शासनाने देखील हुडकोकडे पाठविलेले आहेत मात्र त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही तथापि मा उच्च न्यायालय खंडपीठ मुंबई यांच्या आदेशानुसार दरमहा **रू.** ३.०० कोटी भरण्यात येत आहे. सदर कर्जाचा एकरकमी निपटारा करण्यासाठी महासभेच्या ठरलेल्या धोरणानुसार व नियमानुसार फुले मार्केट गाळा करार नुतनीकरण करणेची प्रक्रिया करण्यात येणार आहे.

सदर जे डी सी सी कर्जाच्या प्रकरणात दरमहा महानगरपालिकेस मा उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार **रू** १.०० कोटी दरमहा अदा करण्यात येत आहे. सदर कर्जाच्या मुद्दल रकमेपेक्षा दुपटीने रक्कम भरणा केल्यावर देखील कर्जाचा भरणा सुरू आहेच. त्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक दायित्वाच्या रकमेत मोठ्या प्रमाणावर वाढ होत असुन आर्थिक स्थिती मुळे महानगरपालिका फक्त दैनंदीन गरजेच्या अत्यावश्यक सेवेच्या देखभाल दुरूस्तीचा खर्च वगळता पुर्णत: नवीन कामांसाठी शासनाच्या निधीवर विसंबून आहे. या वर्षात कर्मचा-यांचे वेतन देखील २ - ३ महीन्यांपासुन थकीत आहेत.

महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या अर्थ संकल्प या सभागृहात सादर करतांना असे नमूद करू ईच्छितो की, सर्व पदाधिकारी व प्रशासनाने एकत्र येवून समन्वयाने आर्थिक उत्पन्नाची बाजू भक्कम करण्याबाबतच्या उपाय योजना हाती घेवून, हुडको कर्जाची परतफेड करण्याचे नियोजन करून जळगाव शहराच्या विकासासाठी, सर्वसामान्यांसाठीच्या मूलभूत सुविधा प्राथमिकतेने पुरविण्यासाठी आपण सर्व प्रयत्नशील राहू.

**[संजय जयराम कापडणीस]**
**आयुक्त**
**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**

**सोबत :-**

१) सन २०१४-१५ सुधारीत अंदाजपत्रकातील वाढ व घटीचा तपशिल विवरण
२) सन २०१४-१५चे सुधारीत (दुरुस्त) अंदाज पत्रक व सन २०१५-१६ करिता उत्पन्न व खर्चाचे अंदाज
३) सन २०१५-१६ करिता उत्पन्न व खर्चाचे अंदाजातील ठळक बाबी.